# प्रेस नोट

दिनांक १४/१०/२०१९

| | |
|---|---|
| युनिट | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १.श्री.हेमंत फकीरराव गांगुर्डे, वय – ४२ वर्ष, व्यवसाय–नोकरी, पद–तहसिलदार, वर्ग–१, तहसिल कार्यालय वरुड, जि.अमरावती.<br><br>२.श्री.अरविंद मोतीराम पवार, वय – ३१ वर्ष, व्यवसाय–नोकरी, पद–मंडळ अधिकारी, वर्ग–३, तहसिल कार्यालय वरुड, जि. अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०००००/–रु. |
| घटनास्थळ | तहसिलदार यांचे कॅबिनमध्ये, तहसिल कार्यालय वरुड, जि.अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि.२०/०९/२०१९ चे १९:४१ वा. ते २०:१६ वा. दरम्यान |

**थोडक्यात हकीकत** :– यातील तक्रारदार व त्यांचे मित्र यांचे दि.१८/०९/२०१९ रोजी मंडळ अधिकारी श्री.पवार यांनी पकडलेले रेती वाहतूकीचे दोन ट्रक सोडल्याबदद्ल मंडळ अधिकारी श्री.पवार व तहसिलदार श्री.गांगुर्डे यांनी प्रत्येकी ट्रकप्रमाणे ७०,०००/–रु प्रमाणे एकूण १,४०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अमरावती येथे दिली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.२०/०९/२०१९ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मंडळ अधिकारी श्री.पवार यांनी तक्रारदार व त्यांचे मित्र यांना तहसिलदार श्री.गांगुर्डे यांचेकडे घेउन गेले असता आरोपी लोकसेवक तहसिलदार श्री.गांगुर्डे व मंडळ अधिकारी श्री.पवार यांनी तक्रारदाराचे ट्रक सोडल्याबदद्ल तडजोडीअंती प्रत्येक ट्रकमागे २०,०००/–रु. कमी करुन दोन ट्रकचे ५०,०००/–रु. प्रमाणे १,००,०००/–रु. लाचेची मागणी करुन मंडळ अधिकारी श्री.पवार यांनी स्विकारण्याचे मान्य केले. परंतु त्यानंतर मंडळ अधिकारी श्री.पवार यांना तक्रारदार यांचेवर काही संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. वरुन दोन्ही आरोपी लोकसेवकांना ताब्यात घेउन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष शेगांवकर, पोलीस निरीक्षक श्री.राहूल तसरे, नापोकॉ. श्री.प्रमोद धानोरकर, श्री.विनोद कुंजाम, श्री.युवराज राठोड पोशि.श्री.वैभव जायले व चालक नापोकॉ.अकबर हुसैन यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :– ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. – १०६४,
दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

( संतोष बी.शेगांवकर )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

Scanned by CamScanner